**केंद्र पुरस्कृत पीएम श्री (PM Schools for rising India) योजनेसाठी सन २०२५-२६ मध्ये अनुसुचित जाती उप योजनेअंतर्गत उपलब्ध निधी वितरित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२६/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०२ मार्च, २०२६

**वाचा:-**

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१३१/एसडी-६ दि.२४.०९.२०२५
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्रमांक:बीजीटी-२०२५/ प्र.क्र.६५/ अर्थसंकल्प दि.१३.०२.२०२६.

**प्रस्तावना :-**

"पीएम श्री " (PM Schools for Rising India) या योजनेअंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील सर्व घटकांचा समावेश करण्याच्या उद्देशाने देशातील सुमारे १५,००० हून अधिक शाळा विकसित करण्यासाठी "पीएम श्री (PM Schools for Rising India) " ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. PM SHRI हि योजना SNA SPARSH या कार्यप्रणालीअंतर्गत कार्यान्वित करण्यात (On Boarding) करण्यात आलेली आहे. त्यामुळे, SNA SPARSH या कार्यप्रणालीअंतर्गत विहित कार्यपद्धती नुसार केंद्र शासनाकडून ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (Recurring - आवर्ती) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य शासनाचा समरुप राज्य हिस्सा (६० : ४० ) लेखाशीर्ष ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (Recurring - आवर्ती) संदर्भ क्र.१ शासन निर्णयान्वये रु. ९१.७८ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

२. केंद्र शासनाकडून ज्या उद्दिष्टाअंतर्गत निधी प्राप्त झाला आहे त्याच उद्दिष्टाखाली निधिचा विनियोग करण्याबाबत केंद्र शासन तसेच वित्त विभागाच्या सुचना/निर्देश आहेत. राज्यात पीएम श्री शाळा विकसित करणे या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिश्यापोटी लेखाशिर्ष २२०२के ८६५ मधील उद्दिष्ट ३१-सहायक अनुदाने मधून ३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान या उद्दिष्टामध्ये रु.५२०७४.०० हजार, तसेच केंद्र हिश्याच्या समरुप राज्य हिश्यासाठी लेखाशिर्ष २२०२के८७४ मधील उद्दिष्ट ३१-सहायक अनुदाने मधून ३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान या उद्दिष्टामध्ये रु.३४७१६.०० हजार इतका निधी पुनर्वितरणास मान्यता देण्याबाबत वित्त विभागास सामाजीक न्याय विभागातर्फे विनंती केली असता त्यास मान्यता प्राप्त झाली आहे.सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये पीएम श्री शाळा विकसित करणे योजनेकरिता अनुसूचित जाती उप योजनेंतर्गत केंद्र हिश्याकरिता लेखाशिर्ष २२०२के८६५, ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या उद्दिष्टामध्ये रु.५२०७५.०० हजार व राज्य हिश्याकरिता लेखाशिर्ष २२०२के८७४, ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या उद्दिष्टामध्ये रु. ३७४१७.०० हजार इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण विभाग यांना अर्थसंकल्पित निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आली आहे.

३. त्यानुसार, पीएम श्री शाळा विकसित करणे योजनेकरिता अनुसूचित जाती उप योजनेंतर्गत प्राप्त केंद्र हिश्याकरिता रु.५२०७५.०० हजार व राज्य हिश्याकरिता रु. ३७४१७.०० हजार असा एकूण रु.८६७९०.०० हजार इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. पीएम श्री " (PM Schools for Rising India) या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीकरिता अनुसूचित जाती उप योजनेंतर्गत पुनर्वितरणाने प्राप्त केंद्र हिश्याकरिता रु.५२०७५.०० हजार व राज्य हिश्याकरिता रु. ३७४१७.०० हजार असा एकूण रु.८६७९०.०० हजार इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना खालील तक्त्यामध्ये नमूद लेखाशिर्षनिहाय सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | हिस्सा | लेखाशिर्ष /योजना | उद्दिष्ट्य | वितरित करावयाची रक्कम. **( रु.हजार मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| १) | केंद्र हिस्सा | (०१) (०९) राज्यात पीएम श्री शाळा विकसित करणे (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम) **३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान** **२२०२के८६५** | ३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान | रु.५२०७५.०० |
| २) | राज्य हिस्सा | (०१)(१०) राज्यात पीएम श्री शाळा विकसित करणे (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) **३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान** **२२०२के८७४** | ३५-भांडवली मत्तेच्या निमिर्तीकरिता अनुदान | रु. ३७४१७.०० |
| | **एकूण** | | | **रु.८६७९०.००** |

२. सदर निधी खर्च करताना केंद्र शासनाच्या दि.२४.०७.२०२५ रोजीच्या निधी वितरण आदेशामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यात यावे. वरील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे ज्या घटकांसाठी व ज्या बाबींसाठी निधी वितरीत करण्यात आला आहे, त्याच मर्यादेत त्या घटकांसाठी व बाबींसाठी निधी खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी सदर तरतुद खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम तसेच संदर्भाधीन वित्त विभागाचे परिपत्रक दि.०७.०४.२०२५ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक दि.१५.०४.२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०२१३०१५६८८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORT DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e891811 8634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F 7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.03.02 13:02:46 +05'30'

**( तुषार महाजन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.सभापती व मा.उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, मुंबई.
८. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मा.मंत्री, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
११. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, पुणे
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
१४. उप सचिव / सह सचिव, विद्यार्थी विकास, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सह संचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१६. सह संचालक (प्रशासन, अर्थसंकल्प व नियोजन ), शिक्षण आयुक्तालय, पुणे
१७. सह संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१८. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१९. सह संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे
२०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२१. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२२. सर्व कोषागार अधिकारी.
२३. निवड नस्ती (कार्यासन-एसडी-६).